# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

ग्रामीण भारताला सशक्त करण्याचं सरकारचं उद्दीष्ट असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

नवी दिल्ली इथं आज ग्रामीण भारत महोत्सवाचं उद्धघाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

२०१४ पासून सरकार खेड्यातील लोकांचं जगणं समृद्ध करण्यासाठी प्राधान्य देत असून, हे ध्येय साध्य करण्यासाठी सरकारनं प्रत्येक गावात मूलभूत सुविधांची हमी देणारी मोहीम सुरू केल्याचं ते म्हणाले. ग्रामीण समाजांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना आतापर्यंत तीन लाख कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे तसंच स्वच्छ भारत अभियान, पीएम आवास योजना, जल जीवन मिशनद्वारे सर्व ग्रामीण भागाचा फायदा आणि विकासाचे उद्दिष्ट असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. येत्या नऊ तारखेपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार असून विकसित भारत २०४७ साठी स्वावलंबी ग्रामीण भारताची निर्मिती ही या महोत्सवाची संकल्पना आहे.

****

चीनमध्ये सध्या ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस HMPV हा विषाणू वेगाने पसरत असून तेथील रुग्णालयांमध्ये रुग्णांची गर्दी होत आहे. या विषाणुमुळे चीनमध्ये अनेक मृत्यु झाले असून त्यामुळे संपूर्ण जगभरातून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. HMPV, कोरोना आणि माइकोप्लाज्मा न्यूमोनिया यासारखे आजार देखील चीनमध्ये वेगाने पसरत असल्याचंही वृत्त आहे. दरम्यान, आरोग्य विभागातील सर्व अधिकारी परिस्थितीचं निरीक्षण करत असून, नागरिकांनी सातत्याने मास्क वापरावा, हातही धुवावेत, असा सल्ला आरोग्य विभागाकडून देण्यात आला आहे.

****

एस. टी महामंडळ नफ्यात राहण्यासाठी महामंडळाने बृहत कृती आराखडा तयार करावा. यासाठी परिवहन क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, वाहतूकदार यांच्या सूचना व अभिप्रायांचा अभ्यास करावा, अशा सूचना परिवहन, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिल्या आहेत. मंत्रालयात समिती सभागृहात परिवहन विभागाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

राज्यातील बस स्थानकांवर प्रवाशांना दर्जेदार सुविधा देऊन स्वच्छतेची कोटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. महिला प्रवाशांसाठी प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी आदी सूचना त्यांनी यावेळी केल्या.

****

रोजगार हमीच्या कामांची मजुरी वाढवून देण्यासाठी प्रस्ताव केंद्राकडे सादर करावा, अशा सूचना रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिल्या आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

अनेक जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढलेले आहेत तसंच ग्रामीण भागात उद्योग उभारणी मोठ्या प्रमाणावर होत असून उद्योग क्षेत्रातील मजुरीचे दर जास्त आहेत. या बाबींचा विचार होऊन मजुरीचे दर ठरवावेत, अशा सूचनाही मंत्री गोगावले यांनी यावेळी दिल्या.

****

ग्रामीण भागातील प्रत्येक घराला स्वच्छ आणि सुरक्षित पाणीपुरवठा व्हावा असं जलजीवन योजनेचं उद्दिष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेला लवकरात लवकर या सुविधांचा लाभ मिळू शकेल, यासाठी प्रयत्न करावे असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले आहेत. मंत्रालयात पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागामार्फत येत्या १०० दिवसांत होणाऱ्या कामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

****

नांदेड जिल्ह्यातल्या माळेगाव यात्रेत उद्या पाच तारखेला दुपारी बारा वाजता कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहेत. महाराष्ट्र केसरीच्या धर्तीवर माळेगाव यात्रेत विजेत्या मल्लास माळेगाव केसरी हा पुरस्कार दिला जातो. नांदेडसह विविध राज्यांतून कुस्तीपटू मोठ्या संख्येने या स्पर्धेत भाग घेणार आहेत. माळेगावच्या लाल मातीत या कुस्त्या रंगणार आहेत. दरम्यान माळेगाव यात्रेनिमित्त पशु प्रदर्शन, दुग्ध स्पर्धा, तसंच कृषी स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आज माळेगाव यात्रेत बक्षीस वितरण केलं जाणार आहे.

****

क्रिकेट

बॉर्डर – गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेत पाचव्या सामन्यातील दुसऱ्या दिवसाचा खेळ आज संपला. तत्पुर्वी पहिल्या डावात भारतीय संघानं १८५ धावा केल्या तर ऑस्ट्रेलिया संघ १८१ धावांत सर्वबाद झाला. त्यानंतर भारताने आपल्या दुसऱ्या डावात दिवसाअखेर सहा गडी बाद १४१ धावा केल्या आहेत. भारताला आतापर्यंत १४५ धावांची आघाडी मिळाली आहे.

****

विदर्भात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. काल राज्यात सर्वात कमी किमान तापमान ८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. दरम्यान, आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील आणि किमान तापमानात काहीशी घट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****